# प्रकरण दुसरे
# “ ‘भाषण’ या अभिव्यक्ती प्रकाराचे स्वरूप ”

पृष्ठ क्रमांक ३९ ते ५७

# प्रकरण दुसरे
## - 'भाषण' या अभिव्यक्ती प्रकाराचे स्वरूप -

व्यक्ती समाजाचे अंग असते. व्यक्ती व्यक्तिच्या एकत्र येण्याने समाज बनतो. सहजीवन व्यतीत करताना प्रत्येक व्यक्ती विविध पातळ्यांवर परस्परांशी ज्ञान, विज्ञान, भावना, कल्पना, स्वप्ने इत्यादिची देवाण घेवाण करीत असते. ही देवाणघेवाण भाषेमध्ये होते. मानवी जीवनात भाषाव्यवहार सतत सुरू असतो. भाषेशिवाय माणूस ही कल्पना करता येत नाही. एकमेकांशी कोणताही व्यवहार आपण भाषेतून करीत असतो. दैनंदिन जीवनामध्ये मानव कोणताही व्यवहार भाषेशिवाय करू शकत नाही. खरे तर तो बालपणापासून श्रवण, भाषण, वाचन, लेखन ही भाषिक कौशल्ये विकसित करीत असतो. आपण कोणाचे तरी बोलणे ऐकतो, समजावून घेतो, आपले विचार किंवा मनातील भावना समोरच्या व्यक्तीला बोलून दाखवितो. दुसऱ्याने लिहिलेले, छापलेले किंवा आपण स्वत: लिहिलेले आपण वाचतो, आपले विचार भावना लिहितो यातून ही भाषिक कौशल्ये विकसित होत असतात.

श्रवण, भाषण, वाचन आणि लेखन ही कौशल्ये विकसित करण्यासाठी प्राथमिक, माध्यमिक शाळेत प्रयत्नपूर्वक परिश्रम घेतले जातात. मराठी मातृभाषा असणाऱ्या विद्यार्थ्यांना भाषिक कौशल्ये आत्मसात करण्यात सुलभता येते. समाजव्यवहारात भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे. समाजाची धारणा भाषेद्वारा होत असते. माणूस हा सतत भाषेतून वावरत असतो. आपले व्यवहार सामाजिक, व्यक्तिगत, नैतिक, धार्मिक, राजकीय किंवा ज्ञानविषयक पार पाडत असताना भाषेचा वापर करावा लागतो.. व्यवहाराची भाषा सुलभ संज्ञापनाची असावी लागते. जे काही सांगायचे ते सोपेपणाने, नेमकेपणाने व परिणामकारक सांगितले पाहिजे. संज्ञापनाची कौशल्ये हस्तगत केलेली व्यक्ती व्यवहारात यशस्वी होऊ शकते. तर्कशुध्द आणि परिणामकारक 'बोलणे' व्यवहारात उपयोगी पडत असते. भाषा हा अस्मितेचा प्रांत आहे. भाषा ही एक अभिव्यक्ती आहे. 'नेमके बोला', 'आपले म्हणणे थोडक्यात मांडा' असा आपण नेहमी आग्रह धरतो. भाषिक कौशल्ये प्रगत होणे आवश्यक आहे. चांगले ऐकता येणे, चांगले बोलता येणे, चांगले वाचता येणे आणि चांगले लिहिता येणे अपेक्षित असते. 'चांगले' म्हणजे काय?

तर परिणामकारक, प्रभावी ऐकता-बोलता-वाचता-लिहिता येणे होय. प्रभावी भाषिक कौशल्याबाबत मराठी भाषातज्ज्ञ डॉ. स्नेहल तावरे पुढील प्रमाणे संकल्पना मांडतात.

१) प्रभावी श्रवण :

दुसऱ्याचे बोलणे समजावून घेणे, प्रेक्षकाला जे म्हणायचे आहे ते कळणे, मग अडखळणारा अस्पष्ट बोलणारा असला तरी त्याचे म्हणणे सवयीने समजावून घेणे, ऐकणे आवश्यक असते. हे जन्म झाल्यापासूनच सुरु होते. परंतु विमानतळ, रेल्वे स्टेशन, सभा अशा ठिकाणी श्रवणशक्तीचा कस लागत असतो. बरेचदा अनोळखी व्यक्तीचे 'सांगणे' समजावून घेताना त्रास होतो.

२) प्रभावी भाषण :

मुद्देसुद बोलणे, आवाजात चढउतार आणून आपले म्हणणे मांडणे, योग्य तेथे विराम घेणे, युक्तिवाद करता येणे, ग्राहक-श्रोत्यांच्या मनास स्पर्श करणाऱ्या भाषेत विचार भावनांची मांडणी करणे. ग्राहकाला आपले 'म्हणणे' सोप्या व परिणामकारक शब्दात मांडणे, लोकशाही व्यवस्थेत प्रभावी बोलणे तर अत्यंत उपयुक्त आहे.

३) प्रभावी वाचन :

वाचन हे एक प्रकारचे श्रवणच असते. मूक वाचन प्रभावी असले पाहिजे. वाचताना लिहिणाऱ्याचे म्हणणे 'कळले' पाहिजे. वाचन अस्खलित असले पाहिजे. विराम चिन्हांचा उपयोग करून वाचले पाहिजे. लिहिणाऱ्या प्रेषकाला प्रकट करण्याचे कार्य वाचनातून व्हावे लागते.

४) प्रभावी लेखन :

लेखन हे एक प्रकारचे भाषणच असते. जे काही सांगायचे आहे तेच प्रभावीपणे लिहिले जावे लागते. वक्ता येथे लेखक झालेला असतो. तेव्हा भाषणाला लिखित व्यवस्थित परिणामकारकरित्या बसवता आले पाहिजे. विरामचिन्हांचा वापर करून सुवाच्य व सुंदर हस्ताक्षरात लेखन करता येणे आवश्यक असते.

''माझे लेखन 'मी' ची अभिव्यक्ती असते. येथे मी लिखित रूपात व्यक्त होतो. मुद्देसुद, तर्कशुध्द, सुगम भाषेत वाक्यरचना आवश्यक असते. लिहिणारा आपल्याशी बोलतो आहे.विचारांची मांडणी करतो आहे असे वाटले पाहिजे.''[१] वरील भाषिक कौशल्ये आपल्या दैनंदिन जीवनात अतिशय महत्वपूर्ण ठरतात. यामध्ये प्रामुख्याने 'भाषा' किंवा भाषण-संभाषण याला मानवी जीवनात अनन्य साधारण महत्व आहे. भाषण हा एक

सुसंवाद साधण्यातला दुवा मानला जातो. प्रामुख्याने 'भाषण' या कौशल्याचा सविस्तर अभ्यास करणे गरजेचे आहे.

१) भाषण संकल्पना :-

मानव हा विचार करणारा प्राणी असल्यामुळे तो बुध्दिमान म्हणून ओळखला जातो. आपले जीवन सुखी-समाधानी बनविण्यासाठी तो सतत प्रयत्नशील असतो. बालपणापासून बोलण्याची कला अवगत करीत असतो. ही बोलण्याची कला मानवाने अनेक वर्षापासून आत्मसात केली आहे. मानवाला निसर्गाने दिलेली देणगीच आहे. जणू प्रत्येकजण अनेक बाबींबद्दल बोलून आपले विचार प्रकट करतो. एकमेकांशी सुसंवाद साधून आपले दैनंदिन व्यवहार आपण करीत असतो. यालाच आपण 'संभाषण' म्हणतो. संभाषण हे बालपणापासून उपजत अनुभवांतून घडत असते. माणसां-माणसांतील परस्परसंबंध हा संवादातून साधता येतो. या परस्पर संबंधाला अतिशय महत्त्व असते.तो एक जगन्नाथाचा रथ असतो. मानवाचे जीवन संभाषणाशिवाय असू शकत नाही. संवाद - संभाषण हे जिवंतपणाचे लक्षण असते. विविध विचारांची आणि मतांची देवाण-घेवाण होत असते. यालाच 'भाषण' म्हणतात.

आपण दैनंदिन व्यवहारात एकमेकांशी बोलतो ते एक प्रकारे भाषणच असते. ते बरेचसे अनौपचारिक स्वरूपाचे असते. कामानिमित्त केलेले संभाषण औपचारिक पातळीवर केले जाते. सभोवताली भाषणे ही मात्र अतिशय वेगळी असतात. तिथे एक वक्ता आणि हजारो श्रोते असतात. तेथे या जनसमुदायाचे भान ठेवून त्यांच्याशी सुसंवाद साधला जातो. वक्त्याला जे काही सांगावयाचे आहे ते ठरवून दिलेल्या विषयावरच सांगावे लागते. त्यासाठी वेळही ठरवून दिलेली असते. मूळ मुद्दयाला धरूनच वक्त्याला बोलावे लागते. मुद्दयाच्या भोवती फिरत राहून चालत नाही. श्रोत्यांची मने खिळवून ठेवण्यासाठी अतिशय प्रभावी वक्तृत्व हवे असते. साधी-सोपी-सरळ भाषा असावी लागते. अलंकारिक बोजड भाषा श्रोत्यांपर्यंत वक्त्याचे विचार पोहोचविण्यासाठी अडथळा ठरू शकते. म्हणून वाक्ये छोटी-छोटी असावीत. वाङ्मयीन सौंदर्याने नटलेले भाषण प्रभावी ठरते. श्रोत्यांवर या भाषणाची छाप पडत असते. त्यांच्या आवडीला ते भाषण पात्र ठरते. त्यासाठी जाणीवपूर्वक काही गोष्टी करून वक्तृत्व बनविणे गरजेचे ठरते. वाचन, मनन, चिंतनयुक्त भाषणे खऱ्या अर्थाने उत्स्फूर्त ठरतात. 'उस्त्फूर्त' भाषणे श्रोत्यांना अधिक आकर्षक वाटतात.

A

## २) भाषण एक कौशल्य :-

'वक्ता दशसहस्त्रेषु' या उक्तीप्रमाणे 'भाषण' सर्वांनाच जमेल असे नाही. लाखात एखादाच वक्तृत्व करतो. आपल्या महाराष्ट्रात असे फारच थोडे 'सभा जिंकणारे वक्ते' होऊन गेले आहेत. आचार्य अत्रे, पु.ल. देशपांडे, आगरकर, संत गाडगेबाबा, महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यशवंतराव चव्हाण, अगदी अलीकडचे प्राचार्य शिवाजीराव भोसले इ. नामांकित मंडळी नावारूपाला आली. त्यांचे वक्तृत्व रसिकांच्या हृदयाचा ठाव घेणारे मोहिनी घालणारे ठरले. प्रभावी वक्तृत्वातून त्यांनी महाराष्ट्राला 'वक्तृत्व' दिले. आपल्या वक्तृत्वावर, वाणीवर त्यांनी प्रभुत्व मिळवले.

भाषण हा एक अभिव्यक्तीचा प्रकार आहे. वाचन, मनन, चिंतन यातून एक वैचारिक दृष्टी प्राप्त होत असते. वेगवेगळे अनुभवांचे साचलेपण त्या व्यक्तीत होत असते. हेच विचारमंथन, वेगवेगळे विषय व्यक्ती वेगवेगळ्या शैलीत मांडत असते. भाषण ही एक कला आहे. ही कला सर्वांना अंगभूत असतेच असे नाही.ती एक कला आहे, माणसे जोडणारा पूल आहे. जर लहानपणापासून ती अवगत करण्याचा प्रयत्न केला तर निश्चितच त्यामध्ये प्रभावी कौशल्य प्राप्त होते. त्यासाठी माणसाच्या अंगी प्रचंड इच्छाशक्ती, चिकाटी, वाचनाची आवड असणे गरजेचे आहे. या कलेची उपासना केली तर निश्चितच रसिक मनाला भुरळ पाडणारी भाषणे निर्माण होऊ शकतात.

भाषणे उत्कृष्ट करावयाची असतील तर त्यासाठी प्रथम सखोल वाचन, मनन त्यावरती चिंतन यांची अधिक गरज असते. 'वक्तृत्व' ही कला अंगी बाणविण्यासाठी चांगल्या श्रोत्याची भाषणे ऐकणे हे आवश्यक असते. वक्तृत्वामध्ये सातत्य टिकवावे लागते. तरच त्याच्यामध्ये अधिक सुधारणा होत जाते. यासंदर्भात डॉ. स्नेहल तावरे म्हणतात - ''भाषण वक्त्याकडून बोलले जाते आणि एकाच वेळी ते भाषण हजारो, लाखो लोकांकडून ऐकले जाते. त्यामुळे उगीचच अवघड शब्दात लिहिलेली लांबलचक वाक्ये ही श्रोत्यांच्या दृष्टीने अर्थहीन ठरतात. कारण श्रोता इतक्या झटकन् त्याचे आकलन करू शकत नाही. म्हणून साधी, सरळ, सोपी वाक्यरचना ही चांगल्या भाषणाची वैशिष्टये समजली जातात.''[२] भाषणे जितकी उत्स्फूर्त असतील तितकी ती प्रभावी ठरतात. भाषण हे कौशल्य आत्मसात करण्यासाठी सरावाची, व्यासंगाची अधिक जरूरी असते.

वक्तृत्व ही एक कला आहे. प्रत्येक माणूस उत्तम व्याख्याता होऊ शकतोच असे नाही. तरी त्यासाठी आवश्यक असणारे प्रयत्न केल्यास ते अशक्य नाही. एखाद्याला खूप

छान बोलता येत असले तरी त्याच्याजवळ सांगण्यासारख्या अनुभवाची शिदोरी नसते. भाषण करण्याची पध्दत असणे जितके महत्त्वाचे आहे, त्याबरोबरच काय सांगायचे आहे याची पूर्ण रूपरेखा असली पाहिजे. ज्या विषयावर बोलायचे आहे तो विषय पूर्णपणे आत्मसात केला तर श्रोत्यांना आकर्षित करून घेता येते. आपले विचार, मते, नवे विचारप्रवाह यांची मांडणी भाषणातून करावयास हवी. तसेच अभ्यासपूर्वक तयारी करून लोकांच्या ज्ञानात कशी भर पडेल याचा प्रयत्न करायला हवा. वक्त्याचे बोलणे तळमळीने व मनापासून आहे हे श्रोत्यांना वारंवार जाणवले पाहिजे. अनुभव स्वत:चे असले किंवा ऐकीव असले तरी ते खुलवून सांगता आले पाहिजेत. नुसते पुस्तकी ज्ञान न देता, सांगायचे ते सोप्या, सरळ पण आकर्षक भाषेत असले पाहिजे, पटवून दिले पाहिजे. त्यासाठी वक्त्याला खूप मेहनत, कष्ट घ्यावे लागतात. वक्तृत्वात नैपुण्य मिळवावयाचे, उत्तम वक्ता व्हायचे तर परिचय करायला हवेत.

भाषणासाठी लागणारी जास्तीत जास्त माहितीची शिदोरी वक्त्याजवळ असली पाहिजे. वक्तृत्वाची मूळ कल्पना वक्त्याला स्वत:ला स्फुरली पाहिजे. त्यानंतर विषयाबाबत जे जे सुचेल ते कागदावर टिपून घ्यायचे. असे कच्चे टिपण तयार केले तर भाषणाची रूपरेषा आपल्याला समजते. नंतर त्या विषयाबाबत तज्ज्ञांनी, जाणकारांनी लिहिलेली पुस्तके मिळवून अधिक माहिती, संदर्भ यांचा समावेश त्या टिपणामध्ये करावा. अशा टिपणातून तयार झालेले भाषण अधिक प्रभावी ठरते.

३) भाषणाची रूपरेषा :-

वक्ते भाषण कशासाठी देतात? त्यामागे निरनिराळी कारणे असतात. भाषणाचे हेतू वेगवेगळे असतात. त्याची तीन विभागात विभागणी करता येईल.

(१) माहितीप्रधान भाषणे -

या वर्गात दिल्या जाणाऱ्या भाषणांचे प्रमाण सर्वाधिक असते. वक्त्याला स्वत:च्या विषयाची माहिती आणि स्पष्टीकरण देण्याची इच्छा असते. हा हेतू मुख्यत्वे करून विषयाच्या प्रकाराप्रमाणे नक्की होतो. भारतातील गरिबी किंवा दूरदर्शनचा बालकांवर होणारा परिणाम, पुस्तक वाचण्याची कला अथवा मजबूत घरबांधणीचे शास्त्र या सर्व विषयांद्वारे वक्ता श्रोत्यांना स्वत:च्या विचारात सहभागी करतो. कसे? प्रश्नांच्या उत्तररूपाने जे काही कळेल ते सर्व या वर्गात येईल. जसे तुमच्या मुलांशी कसे वागाल?,

लोकांशी संबंध कसे जोडावेत?, जीवनात प्रगती कशी करावी? या सर्व विषयातून श्रोत्यांना त्या त्या विषयाची माहिती मिळते.

(२) विचारप्रधान भाषणे -

या विभागामध्ये विचारप्रधान भाषणांचा समावेश होतो. लोकांचे विचार जाणून घेणे, चर्चात्मक विचारांचा श्रोत्यांवर, त्यांच्या विचारसरणीवर फार प्रभाव पडतो. साधुसंत, समाजसुधारक त्यांच्या भाषणांतून समाजावर आवश्यक व योग्य तो परिणाम साधतात. लोक त्यांची प्रवचने सन्मानपूर्वक ऐकतात. तर कधी त्यांचे विचार उग्र आणि न पटणारे असले तर विरोधही करतात. परंतु वक्ता नवीन म्हणून पुढे येत असेल तर त्याचा हेतू लोकांची विचारसरणी बदलण्याचा नाही तर एक प्रभावी वक्ता म्हणून प्रसिध्द होण्याचा असतो. आपल्या विचारानुसार लोकांनी वागावे, त्यांना प्रेरणा द्यावी अशी वक्त्यांची अपेक्षा असते.

(३) मनोरंजनात्मक भाषणे -

श्रोत्यांचे मनोरंजन करणे हा या भाषणाचा हेतू असतो. त्यासाठी भाषणाची भाषा हळूवार असावी लागते. त्यात चुटके, विनोदी गोष्टी, हास्यविनोद, नर्मविनोद यांची रेलचेल असते. सामान्यत: विनोदी वक्ते लोकांना परिचित असतात. त्यांचे नाव ऐकलेले असते. त्यांची भाषणे ऐकलेली असतात. अशा वक्त्यांना श्रोत्यांना कोणतेही ज्ञान, माहिती द्यावयाची नसते, त्याचे मतपरिवर्तन करावयाचे नसते तर निव्वळ करमणूक हा त्यांचा हेतू असतो.

सर्व भाषणे अशाच वर्गीकरणाप्रमाणे असतात असे नाही. पुष्कळ भाषणांत या तिन्हींचा थोडा थोडा अंश व तत्वे असू शकतील.तरी पण मुलभूत तत्व एकच असेल. अशा विभागांमध्ये भाषणांचे वर्गीकरण करता येईल. परंतु शेवटी समोरच्या श्रोतृवर्गावर अधिक अवलंबून असे भाषण करावे लागते.

(४) भाषणाची आकर्षक सुरूवात -

वक्ता माईकसमोर गेल्यानंतर सर्व श्रोत्यांची नजर त्याच्यावर असते. भाषण ऐकण्यासाठी श्रोते आतुर असतात. त्यामुळे भाषणाची सुरूवात आकर्षक झाली तर ते भाषण शेवटपर्यंत प्रभावी होते. मात्र श्रोत्यांची नजर विचलित होण्यापूर्वीच भाषणाला

सुरूवात करावी. भाषणामध्ये प्रथम संबोधन असते. म्हणजेच सुरूवातीचे महत्त्वाचे असे एक अंग असते. उदा. 'सन्माननीय पाटील साहेब, बंधू आणि भगिनींनो'अशा पध्दतीचे असू शकते. स्वामी विवेकानंदांनी अमेरिकेतील सर्वधर्म- परिषदेत आपल्या भाषणाची सुरूवात 'बंधु आणि भगिनींनो' अशी केली होती. नेहमी 'लेडीज अँड जंटलमन' हे शब्द ऐकणाऱ्या अमेरिकन लोकांनी विवेकानंदांची 'ब्रदर्स अँड सिस्टर्स' ही हाक ऐकून तीन मिनिटे टाळ्यांचा कडकडाट केला. कारण त्यांच्या संबोधनातच आत्मीयता, आपलेपणा ओतप्रोत भरला होता. ज्याला उद्देशून भाषण करावयाचे असते त्यांच्याशी जवळीक साधणे महत्वाचे असते.

श्रोत्यांचे लक्ष आकर्षून घेणे व ते टिकवून ठेवणे ही एक मोठी करामत आहे. यामध्ये पहिली पध्दत रसिक प्रश्नाद्धारे करता येईल. यामध्ये श्रोत्यांना आवडतील असे प्रश्न विचारले जातात. विचारांना चालना देण्याचे कार्य यातून होत असते. श्रोत्यांनी उत्तरे द्यावीतच असा आग्रह नसावा. दुसरी पध्दत आश्चर्यकारक कथन करून भाषणाची सुरूवात केली जाते. भाषणाच्या विषयाशी सुसंगत अशी माहिती गोळा करून त्या गोष्टीचा उपयोग करता येतो. वर्तमानपत्रांतुन व इतर ठिकाणी अनेक गमतीदार प्रसंग छापले जातात. फक्त त्यांचा वापर कसा करावयाचा हे कौशल्य वक्त्याला आत्मसात करता आले पाहिजे. तसेच एखाद्या गमतीदार चुटक्यांनीही भाषणाची सुरूवात करता येते. परंतु हा चुटका थोडक्यात असावा. कोणाचेही मन दुखविणारा नसावा. त्यामध्ये फक्त मनोरंजन असले पाहिजे.व्यक्तिगत अनुभवातूनही भाषणाची सुरूवात करता येते. त्याचबरोबर एखाद्या आदर्श व्यक्तिमत्वाचा विचार मांडूनही भाषणाची सुरूवात करता येते. श्रोत्यांना अभिवादन करून किंवा आदर्श व्यक्तिमत्वांना अभिवादन करूनही भाषणाची सुरूवात करता येते. उदा. स्व. इंदिरा गांधी, स्व. राजीव गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची उदाहरणे सांगितली तर ती लोकांना आवडतील. याशिवाय इतरही पध्दतीने भाषणाची सुरूवात करता येईल. ज्या ठिकाणी भाषण असेल तेथील ऐतिहासिक महत्व, श्रोत्यांच्या वर्गानुसार अभिवादन करूनही भाषणाची सुरूवात करता येते.

एकूणच भाषणाची सुरूवात श्रोत्यांच्या मनातील रस जागृत करणारी असली पाहिजे. श्रोत्यांना कंटाळवाणे न वाटता त्यांना आकर्षून घेण्याचे कौशल्य त्यामध्ये असले पाहिजे.

(५) भाषणाचा मध्य -

भाषणाचा मध्य हा त्या भाषणाचा आत्मा असतो. अतिशय साध्या-सोप्या भाषेमध्ये भाषण करणे प्रभावी ठरते. आपली बोलीभाषा भाषणासाठी निवडावी. भारदस्त शब्द व वाक्यप्रचार, उचित मराठी शब्द नाही मिळाला तरी हरकत नाही. हिंदी अथवा इंग्रजी शब्द वापरला तरी चालतो. फक्त अर्थ व्यक्त होणे महत्वाचे आहे. निबंधासारखे बोलणे भाषण कंटाळवाणे बनविते. आपल्या मित्राला एखादा मुद्दा कसा समजावून सांगतो त्याचप्रमाणे भाषणही करावे. भाषण करताना वक्ता आणि श्रोता यांची एकमेकांकडे नजर असणे महत्त्वाचे असते. वाचन करून भाषण केले तर ते श्रोत्यांना कंटाळवाणे ठरते.

भाषण परिणामकारक आणि यशस्वी करावयाचे असेल तर मुख्यत: तयारीनिशी भाषण करावे लागते. याबाबत शीला साळवी म्हणतात - "मनातल्या मनात भाषणाचे मुद्दे, वाक्यरचना, शब्दरचना, म्हणी, वाक्प्रचार यांचा उपयोग करून भाषणाची रूपरेषा तयार करता येते. पाठ न करता फक्त आत्मसात करायचे आहे त्यासाठी सतत मनन चिंतन आवश्यक आहे व ते करणे सहज शक्य आहे. याप्रमाणे केल्यास संपूर्ण तयारीनिशी आत्मविश्वासाने भाषणाला उभे राहता येईल. लिहिलेले शब्द आठवले नाही तरी दुसरे शब्द पटकन् सुचतील. कारण तुमच्या मनावर संपूर्ण भाषण कोरले गेले आहे. स्वत:च्या शब्दातील, आत्मविश्वासाने उच्चारलेले शब्द स्वाभाविक परिणामकारक ठरतील."[३] यासाठी प्रथम मुख्य मुद्दे, तर्कसंगत मते यानुसार प्रभावी शब्दात मांडणी करताना आकर्षक कथन, चुटके, एखादे मजेशीर वाक्य किंवा छोटा प्रसंग सांगितला तर ते भाषण श्रोत्यांच्या पसंतीस उतरते.

श्रोत्यांचे मन आपल्याकडे खिळवून ठेवण्यासाठी वक्त्याला व्यासंगाची आवश्यकता अधिक असते. विषयास अनुसरून 'त्या' विषयावर अनेक तज्ज्ञांची पुस्तके वाचली तर भाषणाचा हा गाभा अतिशय सखोलपणे मांडता येईल. त्यासाठी वक्त्याला वाचन, मनन, चिंतन याची गरज असते. तरच ते भाषण दर्जेदार ठरते. विषयास अनुरूप दृष्टांत, उदाहरणे सांगितली तर श्रोत्यांना ते समजण्यास सोपे जाते. वक्त्याजवळ ज्या विषयावर बोलावयाचे आहे त्यासंदर्भात ज्ञान आवश्यक आहे. मुद्दा पटकन् देण्याचे कौशल्य वक्त्याकडे असावे लागते. एकूणच भाषणाचा मध्य हा भाषणाचा केंद्रबिंदू मानून त्यासाठी नियोजनात्मक तयारी करणे गरजेचे असते.

(६) भाषणाचा संस्मरणीय शेवट -

भाषणाच्या प्रारंभाचे जसे महत्व आहे तसेच समारोपाचेही आहे. समारोप हा श्रोत्यांच्या अधिक लक्षात राहतो. वक्त्याने ''शेवटी मला इतकेच सांगायचे आहे'' असे म्हणताच श्रोते कान टवकारून सावरून बसतात. शेवट हा लांबलचक असू नये. समारोप थोडक्यात पण मनाला चटका लावणारा असावा. यामध्ये भाषणाचा सारांश थोडक्यात सांगावा लागतो. मुख्य मुद्दे मांडावेत. युक्त्या-प्रयुक्त्या सांगाव्यात किंवा पुढील वक्त्याचे भाषण विचारात घेऊन कथन केले तरी भाषणाचा शेवट समर्पक होतो. महत्वाचे म्हणजे भाषणाचा शेवट थोडक्यात करावा लागतो. ऐकणाऱ्याच्या लक्षात राहील अशा एखाद्या वक्त्याचे भाषण संपवावे लागते. श्रोत्यांचे समाधान होईल, चांगले भाषण ऐकल्याचा आनंद मिळेल. असा समारोप करावा लागतो.

भाषणाचा शेवट कसा करावा याबाबत शीला साळवी म्हणतात - ''जशी भाषणाची सुरूवात थोडक्यात असावी तसाच शेवट देखील लांबलचक असू नये. वीस मिनिटांच्या भाषणासाठी दोन मिनिटांचा शेवट योग्य ठरेल. समारोप थोडक्यात पण मनाला चटका लावणारा असावा.''[४]

एकूणच भाषणाचा शेवट समर्पक आणि श्रोत्यांच्या मनाला समाधान देणारा असला पाहिजे.

अशा रितीने भाषणाची रूपरेषा सांगता येईल. भाषणाची कला आत्मसात करण्यासाठी काही महत्वपूर्ण बाबींची आवश्यकता असते. भाषण कशा प्रकारे असावे? याबरोबरच भाषणामध्ये नेमके काय असावे? हे अधिक महत्वाचे आहे. भाषण समृध्द कसे करावे? याबाबत आपणास पुढील प्रमाणे विवेचन करता येईल.

## वक्ता दशसहस्त्रेषु :-

उत्कृष्ट वक्ता सर्वांनाच होता येत नाही. म्हणूनच 'वक्ता दशसहस्त्रेषु' असे म्हटले जाते. दहा हजारात एखादाच वक्ता होऊ शकतो. त्यासाठी अत्यंत व्यासंगाची जरूरी असते. वक्ता हा एकटाच बोलणारा असतो आणि श्रोतृवर्ग हजारोंच्या संख्येने समोर असतो. त्यामुळे वक्ता व्यासपीठावर जाताक्षणीच श्रोत्यांचे मन आकर्षित करून घेण्याचे कौशल्य त्या वक्त्याजवळ असावे लागते. बोलण्यामध्ये आत्मविश्वास असावा लागतो. आपल्या वक्तृत्वावर, वाणीवर हुकुमत असावी लागते त्यासाठी व्यासंगही हवा. आपली पंच ज्ञानेंद्रिये जागृत ठेवणे जरूरीचे असते. त्यासाठी भरपूर वाचन हवे. विविध विषयाचे

वाचन असावे. वाचन हे रसिकतेच्या भावनेचे, ज्ञानार्जनाच्या भावनेने हवे. प्रत्येक विषय, प्रत्येक शास्त्रकला अवगत करता येणे अशक्य असले तरी निदान त्यात डोकावून पाहण्याची वृत्ती असावी. जुजबी ज्ञान घेण्याची वृत्ती असावी, शिक्षण, कला, समाजकारण, राजकारण, धर्मकारण, अर्थकारण, रूढी, परंपरा, मानसशास्त्र इ. विविध अंगांनी सतत चौफेर व्यासंग घडणे आवश्यक आहे तसेच त्याबरोबर विविध कार्यक्रमात अन्य वक्ते कशा पध्दतीने बोलतात, याचा अभ्यास हवा. सभा गाजवणाऱ्या वक्त्यांच्या भाषणाचे चिंतन-मनन घडायला हवे. श्रोत्यांच्या मानसिकतेचा अभ्यास हवा. प्रत्येक विषयानुसार श्रोता भिन्न असतो. श्रोत्याला नेमके काय हवे याची नाडी ओळखता आली पाहिजे. तरच हे भाषण श्रोत्यांच्या मनापर्यंत पोहचते.

महाराष्ट्राला प्राचीन काळापासून वक्त्यांची परंपरा लाभलेली आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, तुकाराम यांच्यापासून संत गाडगेबाबा, स्वामी विवेकानंद तसेच अगदी अलिकडच्या काळातील प्राचार्य शिवाजीराव भोसलेपर्यंतच्या अनेक वक्त्यांनी आपल्या वक्तृत्वाची मोहिनी संपूर्ण महाराष्ट्राला घातली आहे. भाषणांतून लोकशिक्षण, समाजशिक्षण देण्याचा मुख्य हेतू वक्त्याचा असावा लागतो. प्राचीन काळी समाजप्रबोधन करण्याच्या उद्‌देशानेच भाषणे केली जात असत. आजही समाजाला एक नवा विचार, दिशा देण्याच्या माध्यमातून भाषणे केली जातात. प्रभावी भाषणाला श्रोत्यांचा प्रतिसाद अधिक असतो. उत्स्फूर्त टाळ्यांच्या स्वरूपात ते तो व्यक्त करीत असतात. खऱ्या अर्थाने श्रोत्यांचा प्रतिसाद हीच प्रभावी भाषणाची पोचपावती ठरते.

## समृध्द भाषणास आवश्यक घटक :-

### (१) सखोल विषय ज्ञान :-

वक्त्याला आपले भाषण जर सर्वांगानी समृध्द करावयाचे असेल तर प्रथम त्याला निवडलेल्या विषयाचे सखोलज्ञान असणे आवश्यक आहे. जो विषय आपण निवडलेला आहे त्याविषयावरती प्रथम स्वत:च्या अनुभव, ज्ञानातून टिप्पणी काढावी. तद्‌नंतर त्या विषयासंदर्भात ज्या तज्ज्ञांनी, विचारवंतांनी आपापली मते मांडलेली आहेत. त्या अनुषंगाने ग्रंथालयामध्ये जाऊन पुस्तके पाहणे त्यातील टिप्पणी काढावी लागते .त्यांचा समावेश आपल्या भाषणामध्ये करावा. मात्र ते विचार कोणत्यावेळी अन् कसे वापरायचे याचे कौशल्य वक्त्याजवळ असणे गरजेचे आहे.

एखादे विधान समजावून देण्यासाठी विषयानुरूप उदाहरणे, दाखले यांचा वापर भाषण प्रभावी होण्यास उपयुक्त ठरते. उदाहरणे दैनंदिन जीवनातील, स्वतःच्या अनुभवातील, इतरांचे ऐकलेले अनुभव यातून असली तरी श्रोत्यांना ती आवडतात. त्यामुळे श्रोत्यांची जिज्ञासा वाढते. कधी-कधी श्रोते भाषण विसरून जातात. परंतु उदाहरणे मात्र विसरत नाहीत म्हणून उदाहरणे, दृष्टांत हे भाषणाचे महत्वाचे अंग समजले जाते.

## (२) विनोदी चुटके -

भाषण रोचक बनविण्यासाठी भाषणामध्ये विनोदी चुटके सांगणे महत्वाचे समजले जाते.विषय निबंधासारखा न सांगता वक्तृत्वपूर्ण शैलीतून सांगितला जावा, श्रोत्यांना तो कंटाळवाणा वाटू नये यासाठी चुटके सांगितले जातात. वातावरणात व भाषणात चुटक्यांमुळे रंग भरला जातो. चुटके सांगणे ही एक कला आहे. चुटके ऐकताच श्रोते त्यात समरसून गेले पाहिजेत. अशा रितीने अतिशय शांतपणे ते सांगावेत. अतिशय सपर्मक भाषेत थोडक्यात हे चुटके सांगता आले पाहिजेत. लांबलचक चुटक्यांमुळे त्यातील मजा निघून जाते. श्रोते हे चुटके रस घेऊन ऐकतात.

## (३) व्यासंग, साधना, सराव :-

''कुठलेही क्षेत्र असो, त्या त्या क्षेत्रातील मंडळींना आपल्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव वाढण्यासाठी सातत्य ठेवावे लागते. सराव करावा लागतो, साधना लागते. प्रभुत्व मिळविण्यासाठी सर्वांगीण व्यासंगही वाढवावा लागतो.''[३] असे डॉ. मधुसूदन घाणेकर म्हणतात. त्याप्रमाणे भाषणामध्ये या त्रिसूत्रीची आवश्यकता आहे. यशस्वी अन् प्रभावी भाषणासाठी वक्त्याला व्यासंगाची आवश्यकता आहे. भरपूर वाचन, मनन, चिंतन यातून वक्त्याची स्वतःची एक दृष्टी तयार होत असते. वेगवेगळ्या वक्त्यांची भाषणे ऐकून त्यातील चांगल्या गोष्टी शिकता आल्या पाहिजेत. भाषण दर्जेदार बनविण्यासाठी तयारी करण्याची गरज असते. 'प्रयत्नांती परमेश्वर' या उक्तीनुसार यशासाठी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे.

साधना केल्याशिवाय कोणतीही गोष्ट साध्य होत नाही. भाषणाची साधना करून सतत जर सराव केला तर भाषणामध्ये हळूहळू सुधारणा होत जाते. त्यासाठी घरामध्ये आरशासमोर बसून जरी सराव केला तरी प्रत्यक्षात भाषण न चुकता ओघवते

होऊ शकते म्हणूनच व्यासंग, साधना आणि सराव या त्रिसूत्रीच्या सहाय्याने प्रभावी भाषण होऊ शकते.

(४) बहुश्रुत व्यक्तिमत्व :-

वक्ता हा बहुश्रुत असावा लागतो. अनेक व्याख्याने, अनेक परिसंवाद, चर्चासत्रे, कथानके, माहितीपर बातम्या, विनोदी प्रसंग, वेगवेगळ्या व्यक्तिमत्वांशी चर्चा इ. गोष्टी त्याच्या ऐकिवात असाव्यात. वैचारिक प्रगल्भता, अनुभवसंपन्नता यातून येत असते. अनेक विचार ऐकण्याचीही सवय वक्त्याला आवश्यक असते. बहुश्रुत व्यक्तिमत्व हे समृध्द भाषणास अत्यंत उपयुक्त ठरते.

ऐकावे जास्त आणि बोलावे कमी या विचारानुसार दुसऱ्याचे मत, विचार ऐकून आपली वैचारिक प्रगल्भता वाढविणे स्वतःच्या फायद्याचे ठरते. वक्त्याला हा गुण अंगी बाणविणे गरजेचे आहे. अनेक बाबींची, वृत्ती-प्रवृत्तींची माहिती यातून मिळत असते. याचा उपयोग भाषण सजविण्यास होत असतो. एकूणच वक्त्याचे व्यक्तिमत्व बहुश्रुत असावे.

(५) श्रोत्यानुरूप शैली :-

शाळेतील विद्यार्थ्यांसमोर भाषण करावयाचे असेल तर वैचारिक भाषाशैलीचा, उदाहरणांचा काही उपयोग होत नाही. समोर ज्या वयोगटातील, वातावरणातील आणि ज्ञानी आहे की अज्ञानी याची जाणीव ठेवून वक्त्याने आपले भाषण केले तर ते भाषण प्रभावी ठरते. उदा. शेतकऱ्यांसमोर बोलावयाचे असेल तर इंग्रजी वाक्यांचा भडिमार, विचारवंतांची मते, संदिग्ध शब्दरचना टाळावी लागते. शेतकऱ्यांना समजेल अशा त्यांच्या बोलीभाषेत वक्त्यानेही त्यांच्याशी बोलणे महत्त्वाचे आहे. म्हणजे श्रोत्यानुरूप भाषाशैली हे समृध्द भाषणाचा महत्त्वाचा घटक आहे.

'वक्ता हा वक्ताची नव्हे श्रोतेविण'. वक्त्याला श्रोते असतील तर महत्त्वाचे स्थान आहे. समोर श्रोतेच नसतील तर भाषण कोणासाठी करणार? म्हणून श्रोत्यांना महत्त्वपूर्ण स्थान वक्त्याच्या भाषणामध्ये असावयास लागते. त्यांचे मन न दुखविता, त्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवरील भाषण श्रोत्यांना खूप आवडते. म्हणून श्रोत्यांविषयी आकस न ठेवता वक्त्याने प्रेमळ, लाघवी भाषेत भाषण केले तर ते भाषण प्रभावी ठरते.

(६) आवाजाचे तंत्र :-

मराठी भाषा वळवावी तशी वळते अन् पळवावी तशी ती पळते. म्हणून तिचा वापर हा जपून होणे आवश्यक आहे. भाषणामध्ये आवाजाचे महत्त्व अनन्य साधारण आहे. समृध्द भाषणामध्ये वक्त्याचा आवाज अतिशय मृदु पण स्पष्ट आणि खणखणीत असा असला पाहिजे. वाक्यात, शब्दात अर्थानुसार चढउतार असले तरच ते योग्य अर्थानिशी श्रोत्यांपर्यंत पोहचते.

भाषण करीत असताना सावकाश पण मोठ्याने बोलता आले पाहिजे. पाठीमागील श्रोत्यांनाही समजेल याची दक्षता घ्यावी लागते. वक्ता आणि श्रोता यांची तार जुळत नसेल तर श्रोत्यांमध्ये आपापसात चर्चा सुरू होतात. त्यासाठी वक्ता आणि श्रोता यांची तार जुळणे महत्त्वाचे असते. वक्ता आणि श्रोता यामध्ये साद-प्रतिसाद घडत असतो. वक्ता आधी बोलतो, श्रोत्यांपर्यंत वक्त्याचे बोलणे पोहोचल्यावर त्या बोलण्याचे श्रोत्यांच्या मनावर पडसाद उमटत असतात आणि नंतर श्रोते त्यावर उत्स्फूर्त दाद देतात. ही दाद श्रोत्यांच्या चेहऱ्यावरील हास्याद्वारे असू शकते, 'अरे वा वा!', 'सुंदर!' अशा उद्‌गारातून असू शकते. म्हणूनच जे बोलायचे ते श्रोत्यांना ऐकू जाईल असे स्पष्ट आणि मोठ्या आवाजात असावयास लागते.

एकूणच भाषण समृध्द करण्यासाठी अभ्यास, व्यासंग, साधना, सराव असला पाहिजे. वक्त्याची बहुश्रुतता महत्त्वाची असते. वक्त्याला स्थळ कालानुसार, वातावरण, परिस्थितीनुसार भाषण करावे लागते. तेच भाषण खऱ्या अर्थाने श्रोत्यांच्या मनाला मोहिनी घालणारे ठरते.

या संदर्भात डॉ. पं. मधुसूदन घाणेकर म्हणतात - '' 'सभा जिंकणारा वक्ता' म्हणून प्रतिमा निर्माण होणे ही एक प्रदीर्घकालीन प्रक्रिया आहे. वेळ घेणारी गोष्ट आहे. त्यासाठी ज्ञान, चिंतनमनन, वाचन, विचारमंथन, बदलत्या परिस्थितीवर जागरूक नजर असावी लागते. या सर्व गोष्टींचा सातत्याने पाठपुरावा लागतो आणि म्हणून हा लांबचा पल्ला गाठण्याअगोदर किमान आपल्याला छोट्या छोट्या कार्यक्रमातून काही वेळ तरी चांगले बोलता आले पाहिजे.''[६]

वक्तृत्वकला आत्मसात करण्यासाठी कोणत्या गोष्टीची आवश्यकता असते याबाबत शीला साळवी म्हणतात - ''प्रसिध्द साहित्यिक, वक्ते यांची भाषणे ऐका. त्यांची बोलण्याची पध्दत, विचार मांडण्याचे कौशल्य, भाषेतील सहजता यांचे निरीक्षण करा.

सतत अवलोकन, प्रयत्न, आवड आणि अभ्यास या गोष्टींनी इच्छित साध्य होऊ शकते..... वक्तृत्व कौशल्य सवयीने साध्य होऊ शकते.''[७]

अशा रितीने भाषण ही एक अभिव्यक्ती असून ती समृध्द करण्यासाठी सतत प्रयत्नांची, वाचनाची, सरावाची गरज असते. वक्तृत्व ही कला साध्य करण्यासाठी त्याबाबतची मनापासूनची आवड, व्यासंग यांची वक्त्याला जरूरी असते. आज अनेक वक्ते आपल्या वक्तृत्वाने प्रसिध्दीस पावत आहेत. श्रोत्यांच्या मनाला आनंद, समाधान देण्याचा प्रयत्न करत आहेत. खऱ्या अर्थाने ही कला आत्मसात करण्यासाठी सरावाची अधिक जरूरी आहे. त्याला वाचन-मनन-चिंतनाची जोड हवी असते. तरच उत्तम वक्ता होऊ शकतो असे मला वाटते.

## भाषण म्हणजे संवादच : यशवंतराव चव्हाण :-

यशवंतरावांनीही भाषण कसे असावे? त्याचबरोबर स्वत:ची भाषणे कशी होती? याबाबत विचार मांडलेले आहेत. यातून भाषण हा एक अभिव्यक्तीचा प्रकार आहे हे त्यांनी सांगितलेले आहे. स्वत:च्या भाषणांचे प्रकार, शैली, आत्मविश्वास, भाषणाची सुरूवात व शेवट, श्रोते व वक्ते यांचे संबंध, भाषणासाठी आवश्यक घटक यासंबंधी त्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत.

यशवंतरावांनी स्वत:च भाषणाविषयक मांडलेले विचार पुढील प्रमाणे सांगता येतील.

### (१) भाषणाचे प्रकार :-

यशवंतरावांनी वेळप्रसंगी केलेल्या भाषणांतून वेगवेगळ्या विषयावर आपली मते मांडलेली आहेत. यामध्ये सामाजिक, राजकीय, आर्थिक, साहित्यिक, शैक्षणिक अशा विविध विषयांवर त्यांनी आपले विचार व्यक्त केलेले आहेत. यातूनच त्यांनी भाषणाचे वेगवेगळे गट सांगितले आहेत.ते म्हणतात - ''आजच्या काळात माझी होणारी वेगवेगळी भाषणे यांचे तीन-चार प्रकार करावे लागतील. राजकीय विषयावरची पक्षासाठी केलेली भाषणे, सामाजिक प्रश्नासंबंधी केलेली भाषणे, व्याख्यानमालेसाठी केलेली भाषणे, साहित्यविषयक सभांतून केलेली भाषणे व लोकसभेमध्ये केलेली भाषणे अशा प्रकारचे भाषणांचे वेगवेगळे गट होतील अशा भाषणांचा उद्देश ही वेगवेगळा आणि शैलीही वेगवेगळी आहे.''[८]

(२) विषयाचा व्यासंग :-

यशवंतराव सांगतात की, भाषणाला वैचारिक प्रगल्भता येण्यासाठी वाचन व चिंतनाची गरज असते. त्यांच्या स्वत:च्या भाषणाविषयी ते म्हणतात - ''सर्व विषयांवरील वाचन व चिंतन असले तर अनपेक्षितपणे एखादया विषयावर बोलण्यास सांगितले, तर मी आज बोलू शकतो असा माझा अनुभव आहे. याच्या पाठीमागे आयुष्यभर केलेला विविध वाचनाचा संग्रह हेच शक्तिस्थान आहे.''[९] यातून ओघवते बोलता येते असे ते सांगतात.

हातामध्ये मुद्दयाचे टिपण न घेता ते बोलत असल्याचे सांगतात. बोलण्यासाठी जो विषय निवडला असेल त्यासाठी चिंतन करण्याची आवश्यकता असते. या विषयाचे महत्व, त्या विषयाची ऐतिहासिक वाढ, त्यांच्यासंबंधी आजचे प्रश्न व त्यावरील उपाय अशा तऱ्हेने त्या विषयाचा विचार ठेवत आणि मांडत असत. अनुभवातून खूप काही शिकता येते त्याप्रमाणेच वाचनातून स्वत:ची काही मते मांडता येतात. यशवंतरावांनी स्वत:ची काही मते झाली आणि त्यामुळे ते आत्मविश्वासाने कोणत्याही विषयावर ठामपणे बोलू लागले. मग तो विषय राजकीय असो वा सामाजिक, शैक्षणिक असो वा साहित्यिक यावरती स्वत:च्या चिंतनातून ते विचार व्यक्त करीत असल्याचे ते सांगतात.

(३) समतोलपणा :-

यशवंतरावांच्या मते कोणत्याही परिस्थितीमध्ये भाषण करावयाचे असेल तर विचाराचा, मनाचा समतोलपणा अतिशय महत्वाचा असल्याचे ते सांगतात. राजकीय प्रश्नांच्या संदर्भात बोलताना पक्षामध्ये भेद न करता ते आपले विचार मांडत असत. या संदर्भात ते म्हणतात - ''त्या वेळच्या विरोधी पक्षांच्या लोकांनीही मला सांगितले की, तुम्ही मनाचा समतोलपणा सोडत नाही ही आनंदाची गोष्ट आहे.''[१०] भाषण खऱ्या अर्थाने श्रोत्यांच्या पसंतीला उतरते ते मनाचा समतोलपणा राखल्याने. स्वत:वर कितीही टीका होऊ दे, वातावरण वादग्रस्त असले तरी यशवंतरावांनी भाषणे करताना अतिशय विचारपूर्वक आणि समन्वय साधण्याच्या भूमिकेतून केलेली भाषणे ही मृदू भाषेतून प्रकटतात. भाषणांमध्ये द्वेष, चीड, मत्सर याचा स्पर्श देखील झालेला नाही. श्रोते कधीही नाराज होऊन जात नसत. विचारांच्या जोडीला आचरण असल्यामुळे ती भाषणे ताकदीची वाटत असत. एकूणच यशवंतरावांनी आपल्या भाषणांमध्ये 'मनाचा समतोल' ठेवला असल्याचे दिसून येते.

(४) भाषण मांडणी :-

यशवंतरावांनी स्वत:च्या भाषणाची मांडणी कशी असते हे सांगताना भाषणाची सुरूवात आणि शेवट याबाबतही विचार मांडलेले आहेत. 'मी आकर्षक सुरूवात आणि समर्पक शेवट करीत असे' असे ते सांगतात. कोणत्याही विषयावर बोलत असताना एखादा नवा विचार दिल्याशिवाय समाधान होत नसल्याचे यशवंतराव सांगतात. संपूर्ण आयुष्यभर केलेल्या भाषणातून अतिशय निष्ठेने हेच करत असल्याचे ते सांगतात.

भाषण रंगविण्यासाठी यशवंतराव योजनापूर्वक काही बाबींची खबरदारी घेत असत. या संदर्भात ते म्हणतात - ''भाषण रंगविण्यासाठी काही प्रसंगी काही आडाखे जरूर बांधावे लागतात. परंतु मला याची पूर्वतयारी करावी लागत नाही. आडाखे मी भाषणाला उभा राहिलो, म्हणजेच मला सुचतात हा दैवी योग आहे.''[11] यासाठी भाषणास उभे राहिले म्हणजे मनात विचारांची स्पष्टता असायला पाहिजे, आत्मविश्वास असायला हवा, मग आपोआपच भाषणे रंगत जातात असा स्वत:चा अनुभव असल्याचे यशवंतराव सांगतात. त्यांच्या मते स्वत: आरडाओरडा करून बोलणारा वक्ता नसल्याचेही ते सांगतात. एकूणच यशवंतरावांनी स्वत:ची भाषणे मुद्देसुद, आकर्षक, प्रेमळ भाषेतील आणि वैचारिकतेनं नटलेली असल्याचे सांगितले आहे.

(५) श्रोते व वक्ते यांचा मनोमिलाफ :-

यशवंतरावांनी स्वत:च्या भाषणाचे एक महत्वपूर्ण वैशिष्टय सांगितले आहे ते म्हणजे श्रोते आणि वक्ते यांच्यामध्ये मनोमिलाफ होत असे. ते सांगतात की, बोलण्याच्या ओघामध्ये लोकसभेमध्ये बोलताना स्वत:च्या वाक्याची सुरूवात झाली की त्यातील पुढचे शब्द कोणते असतील याची कल्पना श्रोत्यांना येत असे. वाक्याचा शेवट कसा करणार याचे शब्द ते बोलू लागत. हा वेगळा विशेष यशवंतराव स्वत: सांगतात.

म्हणजेच यशवंतरावांची भाषणे ऐकत असताना श्रोत्यांना त्यांतील वाक्यरचनेचा अंदाज येत असे. असा श्रोत्यांचा वक्त्याशी मनोमिलाप झाल्याचे ते सांगतात. कोणतेही भाषण असो ते श्रोत्यांसाठी असते. परंतु वक्ता जर स्वत:च बडबडत राहिला तर मात्र श्रोते आणि वक्ता यांचा मनोमिलाफ होत नसल्याचे यशवंतराव सांगतात.

## (६) भाषणाची शैली :-

यशवंतराव स्वत:च्या भाषणाची शैली संभाषणाच्या पध्दतीची असल्याचे सांगतात. ते म्हणतात - ''माझ्या भाषणाची शेली ही संभाषणाच्या पध्दतीची आहे कारण वक्ता व श्रोते यांच्यामध्ये संवादाचे वातावरण निर्माण झाल्याशिवाय भाषण यशस्वी होत नाही असा माझा अनुभव आहे.''[१२] लांबलचक भाषणाची सवय नसल्याचेही यशवंतराव सांगतात. कोणत्याही कार्यक्रमातील भाषण करताना ते चाळीस मिनिटांपर्यंतच भाषण करत. श्रोता समोर ज्या वयोगटातील असेल त्यानुसार शैलीचा वापर ते करत. लहान मुले, स्त्री, पुरूष, वृध्द माणसे यांची जाणीव ठेवून ते भाषण करीत. श्रोता अशिक्षित आहे की सुशिक्षीत आहे याचा विचार करूनच यशवंतराव भाषणे करत असल्याचे ते सांगतात.

## (७) उत्कृष्ट व्याख्याने :-

प्रसिध्द वक्त्याची व्याख्याने ऐकल्याचा फायदा नवीन वक्त्याला होत असतो. यशवंतरावांनी अनेक उत्कृष्ट वक्त्यांची व्याख्याने ऐकली होती असे ते स्वत: सांगतात. उत्कृष्ट इंग्रजी वक्तृत्व असलेले वक्ते सर्वश्री सर्वपल्ली राधाकृष्णन्, श्रीनिवास शास्त्री, भुलाभाई देसाई यांची अतिशय प्रभावी विचारपूर्वक भाषणे ऐकली असल्याचे यशवंतराव सांगतात. परंतु कोणाचेही अनुकरण स्वत: केले नसल्याचेही ते सांगतात. त्याचबरोबर तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, श्री काकासाहेब गाडगीळ, ना.सी. फडके यांची भाषणेही मन लावून ऐकल्याचे ते सांगतात. या संदर्भात यशवंतराव म्हणतात - ''श्री ना.सी. फडके यांच्या मराठी भाषेच्या उच्चाराचा परिणाम आजही माझ्या मनावर आहे. इतके स्वच्छ मराठी बोलणारा माणूस मी क्वचितच पाहिला असेल. श्री काकासाहेब गाडगीळ यांच्या भाषणात खट्याळपणा, चिमटे-चपाटे असत. परंतु विचाराने परिपूर्ण भाषण ऐकावयाचे असेल तर ते तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांचे आजही मी जेव्हा त्यांचे भाषण ऐकतो, तेव्हा त्यात नवीन विचार आढळतात.''[१३] अशा निरीक्षणातून यशवंतरावांनी स्वत:चे वक्तृत्व प्रभावी अन् संपन्न बनविलेले दिसून येते.

एकूणच यशवंतरावांनी भाषणाबाबत विचार मांडताना काही बाबी आवश्यक असल्याचे सांगितले आहे. त्यांच्यामते भाषणाची थोडी-फार तयारी, चिंतन करणे आवश्यक असते. अनेक विषयांवरील अनेक व्यक्तींची संभाषणे, विचार यांच्या वाचनाचीही आवश्यकता असते हे त्यांनी ओळखूनच ते आत्मसात करण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. वक्तृत्वासाठी वक्तृत्व त्यांनी कधी केले नाही. त्यामुळे त्यांची भाषणे

कधी प्रभावी होत असत तर कधी सामान्य होत असत पण ती कधी पडत नसत असे ते स्वत: आत्मविश्वासाने सांगतात. यशवंतरावांनी अनेक विषयांवर भाषणे केली अन् श्रोत्यांनीही मनापासून त्यांच्या भाषणांना दाद दिली यातून त्यांच्या भाषणाची यशस्विता दिसून येते.

## समारोप :-

भाषण हा एक अभिव्यक्तीचा प्रकार असून तो आत्मसात करता येतो. भाषणाचा विविध अंगांनी विचार करता प्रथम त्याचा सराव करणे, साधना करणे अन् व्यासंग असणे महत्वाचे ठरते. भाषणाचे विषयानुरूप अनेक विषय येऊ शकतात. वक्तृत्व ही एक कला आहे. ती कला सर्वांनाच जमेल असे नाही म्हणूनच वक्ता दशसहस्त्रेषु असे म्हटले जाते.

वक्तृत्वकलेमध्ये अनेक अडचणी येत असतात. श्रोते, वातावरण, अचानक नैसर्गिक संकट, माईक इ. अनेक अडचणीतून वक्त्याने आपले भाषण अखंडपणे अन् प्रभावीपणे करणे हे उत्तम वक्त्याचे महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. या सर्व गोष्टींनी परिपूर्ण असणारा वक्ताच श्रोत्यांचे मन जिंकणारा ठरेल असे मला वाटते.

संदर्भ टीपा :-

१. व्यावहारिक मराठी – स्नेहल तावरे, स्नेहवर्धन प्रकाशन, द्वितीयावृत्ती, सप्टें. १९९८, पृ.क्र. २५-२६.

२. उ.नि. पृ.क्र. ८०

३. तुमचे वक्तृत्व व टाळयांचा कडकडाट – शीला साळवी, सेल्फ डेव्हलपमेंट पब्लिकेशन्स, मुंबई, प्रथम आवृत्ती १९९६, पृ.क्र. २०.

४. उ.नि. पृ.क्र. २३

५. भाषण कला – डॉ. पं. मधुसूदन घाणेकर, नितीन प्रकाशन, पुणे, द्वितीय आवृत्ती, जून १९९९, पृ.क्र. ४२.

६. उ.नि. पृ.क्र. ८

७. तुमचे वक्तृत्व व टाळयांचा कडकडाट – शीलासाळवी, सेल्फ डेव्हलपमेंट पब्लिकेशन्स, मुंबई, प्रथम आवृत्ती १९९६, पृ.क्र. ७२.

८. यशवंतराव चव्हाण शब्दाचे सामर्थ्य – संपा. राम प्रधान, यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान, मुंबई, प्रथमावृत्ती, नोव्हेंबर, २०००, पृ.क्र. ३६९.

९. उ.नि. पृ.क्र. ३६९.

१०. उ.नि. पृ.क्र. ३७०.

११. उ.नि. पृ.क्र. ३७१.

१२. उ.नि. पृ.क्र. ३७१.

१३. उ.नि. पृ.क्र. ३७२.

***